MHLA090021132022

| | | |
|---|---|---|
| प्राप्त दिनांक | : | २४.०६.२०२२ |
| नोंद दिनांक | : | २४.०६.२०२२ |
| निकाल दिनांक | : | १८.०५.२०२६ |
| कालावधी | : | ३व.१०म.२४दि. |

**विद्यमान प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी (न्यायालय क्र.३), उदगीर, जि. लातूर यांच्या न्यायालयात**

(पीठासीन अधिकारी : श्री. भालचंद्र रावसाहेब झेंडे)

**नियमीत फौजदारी खटला क्र.२३९/२०२२**
**निशाणी क्र.३०/ब**

**प्रथम खबर अहवाल क्र. :** १६५/२०२२

**पोलीस ठाणे :** उदगीर (ग्रामीण), ता. उदगीर, जि. लातूर.

**गुन्हा कलम :** भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३२४, ३२३, ५०४ आणि ५०६ सह वाचन कलम ३४ प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| **अभियोग पक्ष** | : | **महाराष्ट्र शासन,** मार्फत : पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी, पोलीस ठाणे उदगीर (ग्रामीण), ता. उदगीर, जि. लातूर. |
| अभियोग पक्षामार्फत विद्वान सहा. सरकारी अभियोक्ता | : | श्रीमती ए. जे. चव्हाण |
| **आरोपी** | १. | **सुनिल राजु उर्फ राजाराम राठोड,** वय : ४४ वर्षे, धंदा : शेती, |
| | २. | **संजय नारायण राठोड,** वय : ३९ वर्षे, धंदा : शेती, उपरोक्त दोन्ही आरोपी रा.: कौळखेड, ता. उदगीर, जि. लातूर. |
| आरोपींमार्फत विद्वान विधीज्ञ | : | श्री. आर. पी. गंभीरे. |

## भाग – ब

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | : | ०६.०५.२०२२ |
| फिर्याद दाखल दिनांक | : | ०६.०५.२०२२ |
| अंतिम अहवाल दाखल दिनांक | : | २३.०६.२०२२ |
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | : | ११.०७.२०२३ |
| पुरावा सुरु केल्याचा दिनांक | : | १८.१२.२०२४ |
| न्यायनिर्णयास राखून ठेवल्याचा दिनांक | : | ०४.०५.२०२६ |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | : | १८.०५.२०२६ |
| शिक्षा घडल्याचा दिनांक (असेल तर) | : | निर्दोष मुक्त करण्यात आल्याने लागू नाही. |

## आरोपींची माहिती

| आरोपी क्रमांक | आरोपींचे नावे | अटक दिनांक | जामीनवर सोडल्याचा दिनांक | गुन्हा कलम | शिक्षा / निर्दोष मुक्तता | शिक्षा | भा.ना.सु. सं. कलम ४६८ प्रमाणे शिक्षेची वजावट |
|---|---|---|---|---|---|---|---|
| आ१ | सुनिल राजु उर्फ राजाराम राठोड | ११.०५.२०२२ | फौ.प्र.सं.कलम ४१–अ (१) प्रमाणे त्याच दिवशी नोटीसवर सोडले. | भा.दं.वि. कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६, ३४ | निर्दोष मुक्तता | नाही. | लागू नाही. |
| आ२ | संजय नारायण राठोड | ११.०५.२०२२ | फौ.प्र.सं.कलम ४१–अ (१) प्रमाणे त्याच दिवशी नोटीसवर सोडले. | भा.दं.वि. कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६, ३४ | निर्दोष मुक्तता | नाही. | लागू नाही. |

# न्यायनिर्णय

(घोषित दिनांक : १८.०५.२०२६)

१. आरोपी क्र.१ व २ विरुद्ध भारतीय दंड संहिता, १८६० (यापुढे सोयीकरिता व संक्षेपाकरिता 'भा.दं.वि.' असा उल्लेख करण्यात येईल) चे कलम ३२४, ३२३, ५०४ आणि ५०६ सह वाचन कलम ३४ अन्वये संपरीक्षा चालविण्यात आलेली आहे.

२. फिर्यादी श्री. चंद्रकांत मारुती बिरादार यांच्या दिनांक ०६.०५.२०२२ रोजीच्या फिर्याद वरून अभियोग पक्षाचे प्रकरण असे की, ते मौजे कौळखेड, तालुका उदगीर येथील कायमचे रहिवासी असून शिक्षक म्हणून नोकरी करतात. दिनांक ०६.०५.२०२२ रोजी सायंकाळी ०५.०० वाजता फिर्यादी हे त्यांच्या शेतातील जुने पत्र्याचे शेड काढून घेऊन जाण्यासाठी गेले होते. ते शेड गाडीत भरत असताना त्यांच्या पुतण्याचा बटईदार नामे सुनील राजाराम राठोड यांनी सदर पत्र नेण्यास मनाई केली व शिवीगाळ केली. फिर्यादीने त्यांना शिवीगाळ का करता असे विचारले असता 'तु हे पत्रे खाली ठेव' असे म्हणून धक्का–बुक्की केली. त्यावेळेस तेथे त्याचा चुलत भाऊ नामे संजय नारायण राठोड हा पळत आला व त्याने देखील फिर्यादीस शिवीगाळ करून लाथा–बुक्क्यांनी मारहाण केली. तसेच त्यांच्या पाठीवर जोराचा चावा घेऊन दुखापत केली. तसेच जाता जाता पुन्हा जर पत्रे नेण्यासाठी आलात तर जिवे मारु अशी धमकी दिली. फिर्यादीचा बटाईदार गुणवंत बाला राठोड व कलाप्पा मारुती राठोड यांनी सदर भांडणाची सोडवा–सोडव केली. सबब, प्रस्तुत फिर्याद.

३. फिर्यादीच्या प्रस्तुत फिर्यादवरून गु.र.क्र.१६५/२०२२ हा भा.दं.वि. कलम ३२४, ३२३, ५०४ आणि ५०६ सह कलम ३४ प्रमाणे नोंद होऊन पुढील तपास पोना/१२२७, श्री. एस. के. रंगवाळ यांच्याकडे देण्यात आला. त्यांनी तपासा दरम्यान घटनास्थळी जाऊन घटनास्थळ पंचनामा तयार केला, जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत केले, साक्षीदारांचे तपास टीपण नोंदविले आणि त्यांच्या तपासादरम्यान आरोपींविरुद्ध सबळ पुरावा आल्याने न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले.

४. आरोपी क्र.१ व २ न्यायालयात हजर झाल्यानंतर त्यांच्याविरुद्ध या न्यायालयाच्या पूर्वाधिकारी यांनी भा.दं.वि. कलम ३२४, ३२३, ५०४ आणि ५०६ सह वाचन कलम ३४ प्रमाणे दोषारोप (नि.क्र.१५) निश्चित केले. प्रस्तुत आरोपींनी त्यांच्या प्रतिकथनात (नि.क्र.१६ व १७) सदर दोषारोप नाकारले व प्रकरणाची संपरीक्षा घेण्याची विनंती केली.

५. प्रस्तुत प्रकरणात संपरिक्षा सुरु होण्यापूर्वी यातील फिर्यादी व आरोपींमध्ये न्यायालयाबाहेर सामंजस्याने भांडण मिटले असल्याबाबत कळवून तशी तडजोड करण्याची परवानगी (नि.क्र.२४) मागितली ; परंतु यातील भा.दं.वि. कलम ३२४ हे अतडजोडपात्र असल्याने तसेच ते भा.ना.सु.सं. कलम ३५९(९) मध्ये बसत नसल्याने सदर अर्ज नामंजूर करण्यात आला. त्यानंतर उभय पक्षकारांनी त्यांच्यात न्यायालयाबाहेर तडजोड झाल्याबाबत संयुक्त पुरसीस (नि.क्र.२५) अभिलेखावर सादर केली.

६. त्यानंतर अभियोग पक्षाने फिर्यादी व घटनास्थळ पंच यांना तपासले आहे. यातील दोन्ही साक्षीदारांनी अभियोग पक्षाच्या प्रकरणास सुसंगत अशी साक्ष न दिल्याची तसेच फिर्यादी व आरोपी यांच्यात प्रस्तुत प्रकरणात तडजोड झाल्याची बाब आणि आरोपींनी वैद्यकीय प्रमाणपत्र (नि.क्र.३०) मान्य केल्याची बाब विचारात घेऊन यातील उर्वरीत साक्षीदार तपासणे निष्फळ होईल, या उद्देशाने नि.क्र.१ खाली आदेश पारीत करून अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

७. आरोपींविरुध्द अपायकारक पुरावा न आल्याने त्यांची भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ३५१(१)(ब) अनुसार असलेली परीक्षा वगळण्यात आली.

८. प्रस्तुत प्रकरणाच्या निकालार्थ खालील मुद्दे उपस्थित होत असून त्यांचे निष्कर्ष सकारण पुढीलप्रमाणे आहेत :

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | आरोपींनी संगनमताने फिर्यादीस घातक शस्त्राने मारहाण करून इच्छापूर्वक जखमी केले, असे अभियोग पक्षाने वाजवी | नाही. |

| | | |
|---|---|---|
| | शंकापलीकडे जावून सिद्ध केले आहे का? | |
| २. | आरोपींनी संगनमताने फिर्यादीस लाथा–बुक्क्यांनी मारहाण करून इच्छापूर्वक जखमी केले, असे अभियोग पक्षाने वाजवी शंकापलीकडे जावून सिद्ध केले आहे का? | नाही. |
| ३. | आरोपींनी संगनमताने सार्वजनिक शांतता भंग होईल या उद्देशाने फिर्यादीस शिवीगाळ केली व त्याअन्वये सार्वजनिक शांततेचा भंग केला असे, अभियोग पक्षाने वाजवी शंकापलीकडे जावून सिद्ध केले आहे का? | नाही. |
| ४. | आरोपींनी संगनमताने फिर्यादीस फौजदारी धाकदपटशा दाखवून जिवे मारण्याची धमकी दिली, असे अभियोग पक्षाने वाजवी शंकापलीकडे जावून सिद्ध केले आहे का? | नाही. |
| ५. | आदेश काय ? | आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात येत आहे. |

## कारणमीमांसा

**अभियोग पक्ष / बचाव पक्ष / न्यायालय साक्षीदारांची यादी :–**

**अ. अभियोग पक्ष :–**

| साक्षीदारांची श्रेणी | निशाणी क्रमांक | साक्षीदारांची नावे | साक्षीदाराचा प्रकार |
|---|---|---|---|
| अ.सा.क्र.१ | १९ | राजकुमार वीरशेट्टी मुळे | घटनास्थळ पंच |
| अ.सा.क्र.२ | २७ | चंद्रकांत मारुती बिरादार | फिर्याद |

**ब. बचावपक्ष :– निरंक.**

**क. न्यायालय :– निरंक.**

**अभियोग पक्ष / बचाव पक्ष / न्यायालय कागदपत्रांची यादी :–**

**अ. अभियोग पक्ष :–**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| १. | नि.क्र. अ–२०/अ.सा.१ | घटनास्थळ पंचनाम्यावरील पंचाची केवळ स्वाक्षरी |
| २. | नि.क्र. अ–२८/अ.सा.२ | फिर्यादवरील फिर्यादीची केवळ स्वाक्षरी |
| ३. | नि.क्र. अ–२९/अ.सा.२ | प्रथम खबर अहवालावरील फिर्यादीची केवळ स्वाक्षरी |

**ब. बचावपक्ष :– निरंक.**

**क. न्यायालय निशाणी :–**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| १. | नि.क्र. न्या–१५ ते १७ | दोषारोप व आरोपींचे निवेदन |
| २. | नि.क्र. न्या–३० | फिर्यादीचे वैद्यकीय प्रमाणपत्र, आरोपींनी मान्य केल्याने |

**ड. भौतिक वस्तु :– निरंक.**

९. उभय पक्षांचे युक्तीवाद ऐकले. अभिलेखावरील पुराव्याचे बारकाईने अवलोकन करण्यात आले.

**मुद्दे क्र.१ ते ४ करिता :**

१०. यातील भांडण हे फिर्यादीच्या शेतातील शेडचे पत्रे घेवून जाण्याच्या कारणावरुन झालेले असून ते एकाच घटनेशी संबंधित असल्याने पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी तसेच संक्षेपाकरिता उपरोक्त मुद्दे एकत्रितपणे विचारार्थ घेतले आहेत.

११. भा.दं.वि. कलम ३२४, ३२३, ५०४ आणि ५०६ सह वाचन कलम ३४ प्रमाणे असलेले आवश्यक घटक म्हणजेच आरोपींनी संगनमताने फिर्यादीस घातक शस्त्राने व लाथा–बुक्क्यांनी मारहाण करुन इच्छापूर्वक जखमी केले व शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली, हे अभियोग पक्षाच्या साक्षीदारांच्या पुराव्यामधून सिद्ध होत आहेत किंवा कसे, हे पाहणे अत्यंत गरजेचे आहे. येथे असे नमूद करणे अत्यावश्यक आहे की, प्रस्तुत आवश्यक घटक सिद्ध करण्याकरिता अभियोग पक्षाने उपरोक्त सारणीमध्ये नमूद एकूण दोन साक्षीदारांच्या साक्षी नोंदवून त्यांच्या पुराव्यावर स्वतःची भिस्त ठेवली आहे.

१२. फिर्यादी चंद्रकांत मारुती बिरादार (अ.सा.क्र.२) यांनी स्वतःच्या साक्षीमध्ये सन २०२२ मध्ये यातील आरोपींविरुद्ध त्यांचे किरकोळ भांडण झाल्याने त्यांनी रागाच्या भरात त्यांच्याविरुद्ध फिर्याद दिल्याचे सांगितले आहे. तसेच सदर घटनेला जवळपास ३ वर्षांपेक्षा जास्त अवधी झालेला असल्याने त्यांना फिर्याद मधील मजकूर आठवत नसल्याचे देखील सांगितले आहे. फिर्यादीने केवळ फिर्याद आणि प्रथम खबर अहवालावरील स्वतःच्या स्वाक्षऱ्या ओळखल्या आहेत ; तर उर्वरीत संपूर्ण मजकुरापासून सपशेल अनभिज्ञता दर्शविली आहे.

१३. आता न्यायालय यातील घटनास्थळ पंचाच्या पुराव्याचे विवेचन करण्यास सुरुवात करत आहे. घटनास्थळ पंच साक्षीदार राजकुमार मुळे (अ.सा.क्र.१) यांनी स्वतःच्या साक्षीमध्ये पोलिसांनी त्यांची केवळ एका कागदावर स्वाक्षरी घेतल्याचे सांगून घटनास्थळ पंचनाम्यातील इतर मजकुरापासून पूर्णतः अनभिज्ञता दर्शविली आहे.

१४. येथे असे नमूद करणे अत्यंत आवश्यक आहे की, उपरोक्त साक्षीदारांनी त्यांच्या अनुक्रमे फिर्याद व पंचनाम्यातील मजकुरापासून पूर्णपणे घूमजाव केलेला आहे. यापूर्वीच नमूद केल्याप्रमाणे अभियोग पक्षाचे अत्यंत महत्त्वाचे साक्षीदार म्हणजेच फिर्यादी व पंच साक्षीदार यांनी अभियोग पक्षाच्या प्रकरणास सुसंगत अशी साक्ष दिलेली नाही. यातील फिर्यादी हे केवळ फिर्यादी नसून ते घटनेतील जखमी साक्षीदार देखील आहेत; त्यामुळे त्यांच्या साक्षीस इतर साक्षीदारांच्या साक्षीपेक्षा जास्त पावित्र्य प्राप्त होते. परंतु त्यांनी त्यांच्या पुराव्यात

घटनेबाबत काहीही सांगितलेले नाही. सबब, विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी भारतीय साक्ष अधिनियम, २०२३ चे कलम १५७ प्रमाणे सदर दोन्ही साक्षीदारांना उलट तपास सदृश्य प्रश्नांची विचारणा केली. त्यामध्ये आरोपींनी त्यांना घटनेच्या दिवशी शिवीगाळ करुन लाथा–बुक्क्यांनी तसेच घातक शस्त्राने मारहाण करुन इच्छापूर्वक जखमी केले तसेच जिवे मारण्याची धमकी दिली, या बाबी फिर्यादीने स्पष्टपणे नाकारल्या आहेत. उलटपक्षी फिर्यादीने प्रस्तुत प्रकरणात त्यांच्यात व आरोपींमध्ये न्यायालयाबाहेर सामंजस्याने तडजोड झाली असल्याचे तसेच त्यांना प्रस्तुत प्रकरणात स्वारस्य नसल्याचे स्पष्टपणे मान्य केले आहे. सबब, सदर उलट तपास सदृश्य प्रश्नांतून देखील अभियोग पक्षास आरोपींविरुद्ध कोणताही ठोस असा पुरावा अभिलेखावर आणण्यात यश आलेले नाही.

१५. येथे असे नमूद करणे अत्यंत आवश्यक आहे की, प्रस्तुत प्रकरणात वैद्यकीय प्रमाणपत्र (नि.क्र.३०) आरोपींनी मान्य केल्याने, अभियोग पक्षाने इतर साक्षीदार तपासले नसल्याचे दिसून येते. जरी आरोपींनी सदर कागदपत्र मान्य केले असले तरीही उपरोक्त तपासलेल्या साक्षीदारांच्या पुराव्यातून आरोपींविरुध्द कोणताही सबळ गुन्हादर्शक पुरावा न आल्याने सदर मान्य बाबी आरोपींना अपायकारक ठरत नसल्याचे स्पष्ट होते. येथे असे देखील नमूद करण्यात येते की, यातील मान्य केल्याची बाब विचारात घेऊन न्यायालयाला देखील स्वतःचे अधिकार वापरून इतर साक्षीदार तपासावेत असे वाटले नाही.

१६. उपरोक्त पुराव्याचे साकल्याने अवलोकन करता आरोपींविरुद्ध काहीही अपायकारक बाबी आलेल्या नाहीत. त्यामुळे आरोपींनी संगणमताने यातील फिर्यादीस शिवीगाळ करुन घातक शस्त्राने तसेच लाथा–बुक्क्यांनी मारहाण करुन जिवे मारण्याची धमकी दिली, हे भा.दं.वि. कलम ३२४, ३२३, ५०४ आणि ५०६ सह वाचन कलम ३४ अन्वये आवश्यक असलेले घटक सिद्ध होत नाहीत. सबब, सदर तडजोडीची बाब विचारात घेऊन आरोपींना त्यांच्याविरुद्ध लावलेल्या सर्व आरोपांमधून निर्दोष मुक्त करणे योग्य व न्यायाचे होईल. अंततः मी मुद्दे क्र.१ ते ४ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवत आहे.

**मुद्दा क्र.५ करिता** :

१७. प्रस्तुत मुद्दा हा आदेशाकरिता आहे. उपरोक्त विश्लेषणांती प्रस्तुत प्रकरणात आरोपींविरुध्द कोणताही गुन्हादर्शक ठोस पुरावा न आल्याने आरोपींना त्यांच्याविरुद्ध लावलेल्या आरोपांमधून निर्दोष मुक्त करण्याच्या निष्कर्षाप्रत हे न्यायालय अगोदरच आलेले आहे. तसेच याकामी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ४८१ प्रमाणे प्रस्तुत न्यायनिर्णयाच्या विरोधात आव्हान दाखल झाल्यास त्या आव्हानामध्ये हजर राहण्याची हमी म्हणून आरोपींनी सहा महिन्यांच्या कालावधीसाठी प्रत्येकी रु.२५,०००/– चे वैयक्तिक बंधपत्र व जामीनदार देणे आवश्यक आहे.

१८. महत्त्वाचे म्हणजेच याकामी कोणताही मुद्देमाल जप्त असल्याचे अभिलेखावरून दिसून येत नाही. सबब, त्याबाबत आदेश नाही. दुसरे असे की, यातील साक्षीदारांनी प्रथम दर्शनी जरी खोटा पुरावा दिला असला तरीही भांडणाचे क्षुल्लक कारण, उभय पक्षांतील संबंध आणि प्रकरणात झालेली तडजोड या बाबी विचारात घेऊन त्यांच्याविरुद्ध खोटा पुरावा दिल्याची कारवाई मी येथे टाळत आहे.

१९. अंतिम परंतु महत्त्वाचे असे की, आजरोजी आरोपी गैरहजर आहेत. यापूर्वीच निष्कर्ष नोंदविल्याप्रमाणे आरोपी हे निर्दोष मुक्त होण्यास पात्र असल्याने भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ३९२(६) मधील परंतुकाप्रमाणे प्रस्तुत प्रकरण निकाली काढण्यात होणारा नाहक विलंब टाळण्यासाठी आरोपींच्या अनुपस्थितीत प्रस्तुत न्यायनिर्णय घोषित करण्यात येत आहे. सबब, उपरोक्त कारणांचा सर्वंकष विचार करता, मुद्दा क्र.५ च्या निष्कर्षार्थ, खालील आदेश पारीत करण्यात येत आहे :

:: **आदेश** ::

१) आरोपी क्र.१ व २ यांना भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३२४, ३२३, ५०४ आणि ५०६ सह वाचन कलम ३४ खालील गुन्हा केल्याच्या आरोपांमधून भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७१(१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येते.

२) आरोपींचे वैयक्तिक बंधपत्र व जामीन बंधपत्र रद्द करून त्यांना बंधमुक्त करण्यात येते.

३) आरोपींनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ४८१ प्रमाणे प्रस्तुत न्यायनिर्णयाच्या विरोधात आव्हान दाखल झाल्यास त्या आव्हानामध्ये हजर राहण्याची हमी म्हणून ६ महिन्यांच्या कालावधीसाठी प्रत्येकी रु.२५,०००/- चे वैयक्तिक बंधपत्र व जामीनदार द्यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)

Digitally signed by BHALCHANDRA RAWSAHEB ZENDE
Date: 2026.05.18 13:11:26 +0530

(भालचंद्र रा. झेंडे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्या. क्र.३), उदगीर.

दिनांक : १८.०५.२०२६
ठिकाण : उदगीर